**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजयी, ७५२ वैध मतांपैकी ४५२ पहिल्या पसंतीची मतं प्राप्त

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून हिमाचल प्रदेश आणि पंजाबच्या पूरग्रस्त भागाचा दौरा, दोन्ही राज्यांना आर्थिक मदत जाहीर

- नमो शेतकरी महासन्मान किसान योजनेचा सातवा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात

**आणि**

- नेपाळचे प्रधानमंत्री के पी शर्मा ओली यांचा राजीनामा, भारतीय नागरिकांना नेपाळ दौरा टाळण्याचा सल्ला

**<><><><><><>**

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत महाराष्ट्राचे राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवारी सी. पी. राधाकृष्णन आज विजयी झाले. एकूण ७५२ वैध मतांपैकी त्यांना पहिल्या पसंतीची ४५२ मतं मिळाली तर इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची ३०० मतं मिळाली. एकूण ७८१ मतदारांपैकी ७६७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला अशी माहिती निवडणूक अधिकारी पी. सी. मोदी यांनी दिली. त्यानुसार विजयासाठी पहिल्या पसंतीच्या मतांचा ३७७ चा कोटा निर्धारित केला होता. त्यातुलनेत राधाकृष्णन यांना ४५२ मतं मिळाली. राधाकृष्णन यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाईस कास्ट- (सुनील)**

*(चंद्रपुरम पोन्नुसामी राधाकृष्णन अर्थात सी. पी. राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतल्या तिरुप्पुरमध्ये ४ मे १९५७ रोजी झाला. व्यवसाय प्रशासन या विषयांनी त्यांनी पदवी शिक्षण पूर्ण केलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे*

*स्वयंसेवक म्हणून काम करणारे राधाकृष्णन १९७४ मध्ये जनसंघांच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य झाले. १९९६ मध्ये तमिळनाडू भाजपाचे सचिव म्हणून नियुक्त झाले. १९९८ आणि १९९९ मध्ये कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून ते निवडून आले होते. २००४ ते २००७ या कालावधीत ते तमिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होते. २०१६ मध्ये कॉइर बोर्डचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १८ फेब्रुवारी २०२३ मध्ये झारखंडचे आणि त्यानंतर ३१ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून त्यांची शपथ घेतली.)*

**<><><><><>**

पूरग्रस्त झालेल्या हिमाचल प्रदेश आणि पंजाब या राज्यांना आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. तसंच मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. प्रधानमंत्र्यांनी आज प्रथम हिमाचल प्रदेशातल्या पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी केली. त्यानंतर कांगडा इथे राज्यातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन झालेल्या नुकसानाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी हिमाचल प्रदेशासाठी पंधराशे कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. तसंच, प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा दुसरा हप्ता आगाऊ रुपात जारी केला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी पंजाबलाही भेट देऊन तिथल्या पूरस्थितीचा आढावा घेतला आणि हवाई पाहणी केली. यानंतर गुरुदासपूर इथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी पंजाबसाठी सोळाशे कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. पंजाबमध्ये पुरामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि गंभीर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांनी आदि कर्मयोगी अभियाना अंतर्गत आज विविध राज्यांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध आदिवासी गटांची भेट घेतली. त्यावेळी आदिवासी समुदायाला देशाच्या उज्जवल भविष्यासाठी आणि विकासासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी केलं. या बैठकीला केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुआल ओराम आणि आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके उपस्थित होते.

आदि कर्मयोगी अभियान यावर्षी जुलैमध्ये सुरू झाल्यानंतर विविध गावांमधील अधिकारी, स्वयंसेवक, बचत गटातल्या महिला आणि आदिवासी तरूणांसह २० लाख आदि कर्मयोगींना एकत्रित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

नमो शेतकरी महासन्मान किसान योजनेचा सातवा हप्ता आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईत वितरित झाला. राज्यातल्या साडे ९१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी २ हजार याप्रमाणे सुमारे १९०० कोटी रुपये जमा होतील. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना दिलं जाईल.

**<><><><><>**

स्वच्छ वायू सर्वेक्षण आणि पाणथळ शहरांच्या पुरस्कारांमध्ये अमरावतीला राष्ट्रीय पातळीवरचा पहिला पुरस्कार मिळाला आहे. ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीत हा पुरस्कार जाहीर झाला. केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव यांनी नवी दिल्लीत या पुरस्कारांचं वितरण केलं. याशिवाय इंदूर, जबलपूर, आग्रा, सुरत, झाशी, मुरादाबाद, अलवर, देवास, परवानु, अंगुल या शहरांनाही विविध श्रेणीत पुरस्कार मिळाले. देशभरातल्या १३० शहरांमध्ये झालेल्या सर्वेक्षणानंतर हे पुरस्कार देण्यात आले.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या पुनर्रचनेत मासेमारी आणि मत्स्यव्यवसायासाठी गरजेच्या अनेक वस्तूंवरचे कर कमी झाले असल्याने या क्षेत्रातल्या व्यावसायिकांना फायदा होणार आहे. त्याविषयी सविस्तर माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- व्हॉईस कास्ट- कौस्तुभ पटाईत**

**<><><><><><>**

नेपाळचे प्रधानमंत्री के पी शर्मा ओली यांनी दिलेला राजीनामा आज राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी स्वीकारला. गृहमंत्री रमेश लेखक, आरोग्य मंत्री प्रदीप पौडेल, कृषी मंत्री रामनाथ अधिकारी, पाणीपुरवठा मंत्री प्रदीप यादव यांनीही राजीनामे दिले आहेत. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत ओली यांनी काळजीवाहू प्रधानमंत्री म्हणून काम पहावं, असं राष्ट्रपतींनी सांगितलं आहे. समाज माध्यमांवरच्या बंदीविरोधात आंदोलन करणाऱ्या हजारो आंदोलकांनी आज ओली यांच्या कार्यालयात शिरून सरकारविरोधी घोषणाबाजी केली तसंच त्यांच्या निवासस्थानाला आग लावली. माजी प्रधानमंत्री प्रचंड, शेर बहादूर देऊबा इतर मंत्री यांच्या घरावरही हल्ला करण्याचा प्रयत्न आंदोलकांनी केला. काही आंदोलकांनी संसदेसह, सर्वोच्च न्यायालयासह इतर न्यायालयातही आग लावली. काठमांडू, पोखरा, इटहरी इथली संचारबंदी झुगारत आंदोलकांनी निदर्शनं केली, त्यामुळं देशभरात तणावाचं वातावरण आहे. नेपाळचे राष्ट्रपती आणि नेपाळी लष्करानं सर्वांना शांतता पाळण्याचं तसंच सहकार्य करण्याचं आवाहन केलं.

**नेपाळमधे** सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तिथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचं आणि नेपाळी प्रशासनानं दिलेल्या मार्गदर्शक सूचना पाळव्यात असं आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे. नेपाळमधला तणाव शांत होईपर्यंत भारतीय नागरिकांनी तिथे प्रवास करण्याचं टाळावं असं आवाहन सरकारनं केलं आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडिया आणि इंडिगो या विमान कंपन्यांनी दिल्ली ते काठमांडू दरम्यानची विमान उड्डाणं आज रद्द केली आहेत.

**<><><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाने देशातल्या सर्व उच्च न्यायालयांना कार्यकारी आदेशांच्या घोषणेनंतर विलंब न करता तर्कसंगत निकाल त्वरीत अपलोड करण्याचे

निर्देश दिले. यापूर्वी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने १८ फेब्रुवारी २०१६ चा निर्णय २ वर्ष पाच महिन्यांनी म्हणजेच १८ जुलै २०१८ मध्ये अपलोड केला होता. त्यामुळे या विलंबाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी.पारडीवाला आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने गंभीर विषय असल्याचे म्हटलं आहे.

गेल्या काही वर्षांपासून काही उच्च न्यायालयांमध्ये तर्कशुद्ध निर्णयाशिवाय आदेशाचा कार्यकारी भाग घोषित करण्याची पद्धत राहिली आहे आणि त्यानंतर खूप कालावधीनंतर तर्कशुद्ध निर्णय अपलोड केला जातो. त्यामुळे न्यायालयाने अनिल राय विरूद्ध बिहार या खटल्याचा हवाला देत या विलंबामुळे याचिकाकर्त्याच्या मनात न्यायालयाच्या विश्वासार्ह्यतेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचं सांगितलं.

**<><><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा आजपासून संयुक्त अरब अमिरातीत सुरू झाली. अबूधाबी इथं आज पहिल्या सामना अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात सुरू आहे. भारताचा पहिला सामना उद्या दुबईत युएईच्या संघाशी तर येत्या १४ तारखेला पाकिस्तान बरोबर होणार आहे. येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**//<><><><><><>//**